INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 4.1625(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 12 | JANUARY – 2017

भारतातील दारिद्रयाची समस्या : एक संक्षिप्त आढावा



प्रा. सुदाम कडूजी कोरडे[1] , डॉ. जयवंत एस. भोयर[2]
[1]सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग, कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय नवापूर जि. नंदुरबार .
[2]प्राचार्य व संशोधन मार्गदर्शक , कै. बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविदयालय हिंगोली.

प्रस्तावना :–

गरीबी किंवा दारिद्रय हे भारतीय अर्थव्यवस्थेला लागलेला एक शाप म्हणून ओळखला जातो. कारण जगातील एकूण दारिद्रय रेषेखालील जीवन जगणा–या लोकसंख्येच्या एक तृतियांश लोकसंख्या ही भारतातील आहे. जागतिक बॅकेच्या 2005 च्या अहवालानुसार 41.6 टक्केवारी भारतीय लोक हे दारिद्रयरेषेखाली जीवन जगत होते.

भारतातील अनेक समस्यांपैकी दारिद्रय ही भारताच्या अर्थव्यवस्थेतील एक गंभीर समस्या आहे. आर्थिक नियोजनाचा स्वीकार करून 66 वर्ष पुर्ण होऊन देखील देशातील अजूनही 26.8 टक्के लोकसंख्या दारिद्रयात जीवन जगत आहे.

असे असले तरी अतिरिक्त लोकसंख्य, दारिद्रय, बेरोजगारी, आर्थिक विषमता, प्रादेशिक असमतोल, शेतीची अल्प उत्पादकता, कुपोषण आणि बालमृत्यू या प्रस्तूत शोधनिबंधात भारतातील दारिद्रयाच्या समस्यांवर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. दारिद्रयाची समस्या ही भारताला स्वातंत्र पूर्वकाळपासून भेडसावत असून इंग्रजांच्या राजवटीत देशातील 80 टक्के पेक्षा जास्त लोक दारिद्रयरेषेखालील जीवन जगत होते. आज सरकारी आकडेवारीनुसार देशात सुमारे 25 टक्के लोक दारिद्रयरेषेखालील आहेत.

संशोधनाची उदिष्टे :– (Objectives)

1) भारतातील दारिद्रयाचे स्वरूप अभ्यासणे.
2) विविध अभ्यास गटांच्या निष्कर्षाचे अध्ययन करणे.
3) दारिद्रयाचे कारणे तपासणे.
4) दारिद्रयाचे परिणाम अभ्यासणे.
5) दारिद्रय निर्मूलनासाठी विविध योजना आणि कार्यक्रमाचा अभ्यास करणे.

संशोधन पध्दती :–

प्रस्तूत शोध निबंध हा दुय्यम साधन सामुग्रीवर आधारलेला आहे. विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके, भारताचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल व तज्ज्ञांचे शोध निबंध इत्यादी मधून माहितीचे संकलन करून प्रस्तूत लेख तयार करण्यात आला.

दारिद्रयाची संकल्पना (Concept of Poverty) :–

दारिद्रयाच्या बाबतीत अनेक तज्ञांनी आपापले विचार व्यक्त केले असले तरी त्यात एकवाक्यता नाही. सापेक्ष दारिद्रय व निरपेक्ष दारिद्रय हे प्रकार दिसून येतात.

1) सापेक्ष दारिद्रय (Relative Poverty) :–

सापेक्ष दारिद्रय ही संकल्पना उत्पन्नातील विषमतेवर आधारीत आहे. म्हणजे ही संकल्पना दोन गटातील उत्पन्न विषमता स्पष्ट करण्यास मदत करते. एक गट हा विशिष्ट उत्पन्न पातळीपेक्षा जास्त असलेला तर दुसरा गट हा विशिष्ट उत्पन्न पातळीपेक्षा कमी उत्पन्न असलेला असतो. साहजिकच कमी उत्पन्नातील गट हा सापेक्षात दारिद्रयात जीवन जगत असतो. कारण या गटातील व्यक्ती यांना मिळाणा–या उत्पन्नातून त्यांच्या सामान्य गरजांची पूर्तता करू शकत नाही.

2) निरपेक्ष दारिद्रय (Absolute Poverty):–

ज्यावेळेस व्यक्तिंची किमान जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी क्षमता नसते तेव्हा त्यास निरपेक्ष दारिद्रय असे म्हणतात. थोडक्यात व्यक्तिला प्राप्त होणा–या उत्पन्नातील त्याच्या किमान अत्यावश्यक, जीवनावश्यक गरजा भागत नसतील तर त्याला निरपेक्ष दारिद्रय असे म्हणतात.

दारिद्रय म्हणजे काय ?

दारिद्रयाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.

1) 'अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या मूलभूत गरजा भागविण्याच्या व्यक्तीच्या किंवा कुटुंबांच्या असमर्थतेस दारिद्रय असे म्हटले जाते.'

2) 'ज्या व्यक्तीला किंवा कुटुंबांला दररोज कमीत कमी 2250 उष्मांक देणारा आहारसुध्दा मिळत नाही अशा स्थितीस दारिद्रय असे म्हणतात.'

3) **प्रा. अमर्त्य सेन** :– "एखादया व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मूल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्रय होय."

भारतातील दारिद्रयाचा अभ्यास :–

भारत सरकारचे नियोजन आयोग हे राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर दारिद्रय विषयक अभ्यास करणारी संस्था आहे. त्याच बरोबर स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर नियोजन आयोगादवारे दारिद्रयाचा अभ्यास करण्यासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या.

1) **दादाभाई नौरोजी** यांनी ब्रिटीश राजवटीने प्रसिध्द केलेल्या आकडेवारीच्या आधारे भारतीयांचे दरडोई उत्पन्न रू. 20 होते. तर त्यावेळी किमान जीवनमानासाठी रू 34 आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून भारतातील दारिद्रयातील तीव्रता स्पष्ट केली.

2) **डॉ. दांडेकर व रथ** यांनी भारतीयांसाठी दररोज 2250 कॅलरीजच्या निकश लक्षात घेउन 1960–67 मध्ये ग्रामीण भागात 40 टक्के तर शहरी भागातील 50 टक्के नागरी लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली असल्याचे सांगितले.

3) **डॉ. ओझा** यांनी 1960–61 मध्ये शहरी व ग्रामीण भागातील एकत्रित दारिद्रयाचे प्रमाण 44 टक्के असल्याचा निष्कर्ष काढला.

4) **डॉ. मिन्हास** यांनी प्रत्येक भारतीय व्यक्तीस प्रत्येक वर्षी 240 रू इतका उपभोग खर्च आवश्यक असल्याचे गृहित धरून 1967–68 मध्ये ग्रामीण भागात 50.60 टक्के लोक दारिद्रय रेषेखालील असल्याचा निष्कर्ष काढला.

5) **प्रा. अर्मत्य** यांनी दारिद्रय आणि सामाजिक कल्याण यांच्या संबंधाच्या संदर्भात 1998 मध्ये आपले संशोधन केलेले आहेत. दारिद्रय व सामाजिक कल्याण यांचा निकटचा संबंध असतो. त्यांच्या मते जेव्हा समाजातील जास्तीत जास्त लोकांच्या गरजा पूर्ण होत नाहीत. तेव्हा दारिद्रयाची निर्मिती होते. त्यांनी सुचविलेले दारिद्रयाचे निर्देशक म्हणजे समाजाची उत्पन्न पातळी उत्पन्न व संपत्तीचे वाटप हे होय. असर्त्य सेन यांच्या मते, 'धान्यांची कमतरता हे दारिद्रयाचे कारण नसून बेरोजगारीमुळे क्रयशक्तीचा अभाव हे भारतातील दारीद्रयाचे प्रमुख कारण आहे.'

6) **जागतिक बॅंकेच्या मते,** 1970 मध्ये 228.3 दशलक्ष लोक दारिद्रय रेषेखालील जीवन जगत होते. यापैकी 236.8 दशलक्ष लोक ग्रामीण भागातील तर 50.5 दशलक्ष लोक शहरी भागातील होते. तसेच 1988 मध्ये दाद्रिदय रेषेखालील लोकसंख्या 322.3 दशलक्ष एवढी वाढली याशिवाय जागतिक बॅंकेने अतिगरीब लोकांविषयी अंदाज व्यक्त केला आहे. त्यांच्या मते दारिद्रयरेषेच्या उपभोग खर्चाच्या 75 टक्के पेक्षा कमी खर्च असणा–या व्यक्तीला अतिगरीब संबोधण्यात आले. त्यानुसार 1988 मध्ये देशातील 39.60 टक्के लोक दारिद्रयात होते, तर 19.20 टक्के लोक अति गरीब होते.

7) **भारतीय नियोजन मंडळाने** सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या कालखंडात (1980–85) दारिद्रय या संकल्पनेची व्याख्या केली. ग्रामीण भागात प्रतिदिनी प्रति माणसी किमान 2400 उष्मांक आणि शहरी भागात प्रतिदिनी प्रतिमाणसी 2100 उष्मांक ज्या व्यक्तीस प्राप्त होत नाही ती दारिद्रयात आहे असे समजावे. यानुसार 1977–78 मध्ये देशात 48.13 टक्के जनता दारिद्रय रेषेखालील जीवन जगत होते.

8) दारिद्रयाचा अभ्यास करण्यासाठी भारतीय नियोजन आयोगने सन 2005 मध्ये **प्रा. सुरे□ा डी. तेंडुलकर** यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. तेंडुलकर समितीने अस्तित्वातील निकषाचा अभ्यास करून त्यात पायाभूत असे बदल सुचवले व बहुआयामी निकष अमलात आणून दारिद्रय निर्धारण करण्यात आले. त्यांच्या निकषानुसार सन 2004–05 मध्ये ग्रामीण भागात 41 टक्के तर शहरी भागात 25.7 टक्के लोक दारिद्रयरेषेखाली जीवन जगत असल्याचा निष्कर्ष काढला.

9) **मोहम्मद युनूस** यांच्या मते "लोक स्वतःहून गरिबी निर्माण करित नाही तेथील व्यवस्थाच गरिबी निर्माण करते. म्हणजेच जनतेवर गरिबी लादली जाते. अर्थात गरिबी आवडते म्हणून कोणीही गरीब नसतो तर योग्य संधीच्या अभावी मनुष्य गरीब होतो. संधी मिळाली तर तो दारिद्रयाचा पिंजरा तोडून समाजात सन्मानाने डोके वर काढू शकतो. " डॉ. युनूस यांचा हा गरिबी विषयीचा सिध्दांत आहे. हया गरिबीवरील सिध्दांताच्या पायातील महत्वपूर्ण बाब म्हणजे सूक्ष्म वित्त होय. अनुदाने, देणग्या, आरक्षण व कर्जमाफी देऊन गरिबी हटणार नाही तर लहान रक्कमांची कर्जे अर्थात सूक्ष्म वित्त हेच गरिबीवरचे औषध आहे.

भारतातील दारिद्रयाचे प्रमाण :–

भारत सरकाने म्हणजेच भारतीय नियोजन आयोगाने नेमलेल्या विभिन्न अभ्यासगटांनी दारिद्रय रेषेची सीमा मर्यादा निर्धारीत करून भारतातील दारिद्रयाची आकडेवारी प्रसिध्द केली आहे. या आकडेवारीवरून भारतातील दारिद्रयाचे प्रमाण लक्षात येते ते पुढीलप्रमाणे.

तक्ता क्र. 1 भारतातील दारिद्रयाचे प्रमाण
डॉ. लकडावाला अभ्यास गट

वर्ष	ग्रामीण	शहरी	एकुण
1973–1974	56.44	49.00	54.88

1977–78	53.07	45.20	51.32
1983–84	45.65	40.80	44.48
1987–88	39.09	38.20	38.86
1993–94	37.27	32.40	35.97
1999–2000	27.09	23.50	26.10

तेंडुलकर अभ्यास गट			
1993–94	50.10	31.80	45.30
2004–05	41.80	25.70	37.20
2009–10	33.80	20.90	29.80
2011–12	25.70	13.70	21.90
डॉ. रंगराजन अभ्यास गट			
2009–10	39.60	35.10	38.20
2011–12	30.90	26.40	29.50

Source :- Press note on poverty estimates 2011-12, Planning commission 2013, Government of India.

तक्ता क्र 1 वरून असे स्पष्ट होते की, 1973–74 मध्ये भारतातील दारिद्रयाचे प्रमाणे 54.88 टक्के होते. 1977–78 मध्ये भारतातील दारिद्रयाचे प्रमाणे 51.32 टक्के होते. 1983–84 मध्ये भारतातील दारिद्रयाचे प्रमाण 44.48 टक्के होते. 1987–88 मध्ये भारतातील दारिद्रयाचे प्रमाण 38.86 होते. 1993–94 मध्ये भारतातील दारिद्रयाचे प्रमाणे 35.97 होते. तर 1999–2000 मध्ये ते प्रमाण सर्वात कमी म्हणजेच 26.10 दिसून आले. वरील लकडावाला अभ्यास गटानंतर आता तेंडुलकर अभ्यास गटाने दारिद्रयाचे निकष बदललेले आहेत. 1993–94 मध्ये भारतातील दारिद्रयाचे प्रमाण 45.30 टक्के होते. 2004–05 मध्ये भारतातील दारिद्रयाचे प्रमाण 37.20 टक्के होते. 2009–10 मध्ये भारतातील दारिद्रयाचे प्रमाण 29.80 टक्के होते. तर 2011.12 मध्ये भारतातील दारिद्रयाचे प्रमाण 21.90 टक्के दिसून येते.

संपूर्ण देशात तेंडुलकर समितीच्या दारिद्रयाच्या निकषावर आक्षेप घेण्यात आला म्हणून भारत सरकारने डॉ. रंगराजन अभ्यास गटाची नियुक्ती केली. या गटाच्या मते 2009–10 मध्ये भारतातील दारिद्रयाचे प्रमाण 38.20 टक्के तर 2011–12 मध्ये भारतातील दारिद्रयाचे प्रमाण 29.50 टक्के दिसून येते. थोडक्यात वरील अभ्यास गटानी दारिद्रयासंदर्भात दिलेले आकडेवारीमध्ये बदल दिसून येतात. वरील तक्त्यावरुन असे दिसून देते की भारतीय अर्थव्यवस्थेत शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात दारिद्रयाचे प्रमाण जास्त आहे.

दारिद्रयाची कारणे :–

दारिद्रयाची विविध कारणे पुढील प्रमाणे आहेत.

1) न्यून विकासाचा दर :–

दारिद्रयाचे प्रमुख कारण आर्थिक विकासाचा वेग कमी असणे हे आहे. 1951–1981 या काळात भारतातील वृध्दीदर सरासरीने फक्त 3.5 टक्के होता. 1981–91 या काळात तो 5 टक्के पेक्षा वाढला. 1991 नंतर आर्थिक सुधारणा काळात वृध्दी दर सरासरीने 5.5 टक्के आहे. लोकसंख्या वाढीच्या वेगाच्या मानाने आर्थिक वृध्दीदर कमी असल्याने भारतात दारिद्रय टिकून आहे.

2) वाढती बेकारी :–

मंद औदयोगीकरण व वाढती लोकसंख्या तसेच माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राची प्रगती यामुळे रोजगार मागणी पेक्षा रोजगार संधी कमी असल्याने दारिद्रय वाढत आहे.

3) अल्प झिरपण प्रभाव :–

या सिध्दांतानुसार विकासाची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर उत्पादन, रोजगार यात सतत वाढ होते. आणि विकासाची फळे तळागाळापर्यंत सर्वांना चाखायला मिळतात. कल्याणकारी राज्यात दारिद्रय दूर करण्यासाठी सरकारच्या योजनामार्फत लोकांना रोजगार मिळेल आणि दारिद्रयाचे प्रमाण कमी होईल. अशी अपेक्षा केली जाते. परंतु प्रत्यक्षात मात्र झिरपण प्रभाव गरीब वर्गापर्यंत अल्प प्रमाणात झाला.

4) निरक्षरता :–

भारतात ग्रामीण भागात आजही निरक्षर वर्ग जास्त आहे. त्यामुळे अकुशल मनुष्यबळ प्रचंड प्रमाणात वाढते. परिणामी कौशल्याच्या अभावामुळे बेकारी वाढून दारिद्रयात वाढ होते.

5) दारिद्रयाचे दृष्टचक्र :–

कोणत्याही देशाची गरीबी त्या देशाच्या दारिद्रयास कारणीभूत असते. भारतात दारिद्रयातील लोकांची बचत करण्याची शक्ती खुप कमी असल्याने भांडवल संचय, भांडवल गुंतवणुक, उत्पादन आणि लोकांचे उत्पन्न कमी राहून दारिद्रयात वाढ होत आहे.

दारिद्रय कमी करण्यासाठी उपाययोजना :–

दारिद्रय कमी करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना सुचविण्यात येतील.

1) दर्जेदार शिक्षण :–

पारंपारिक शिक्षणात बदल व्हायला हवे व्यक्तीला शिक्षण असे मिळायला हवे ज्यामुळे त्याच्या परिस्थितीत बदल होईल व तिचे दारिद्रय कमी व्हायला मदत होईल.

2) कृषी क्षेत्राचा विकास :–

देशातील बहुसंख्य गरीब हे ग्रामीण भागात राहतात. त्यामुळे कृषी क्षेत्राचा विकास करणे आवश्यक आहे.

3) सरकारी योजनांबाबत लोकांचे प्रबोधन करावे :–

लोकांनी सरकारी योजनांचा चांगला व पुरेपूर लाभ घ्यावा यासाठी त्यांचे प्रबोधन करावे. सरकारकडून मिळणा–या मदतीचा दुरूपयोग करणा–याचे प्रबोधन करणे, त्यांना शिस्त लावणे, प्रसंगी त्यांच्यावर कडक कारवाई करणे आवश्यक आहे. त्याशिवाय सरकारी योजनांचा गरिबांना लाभ होणार नाही.

4) लोकांची जबाबदारी :–

लोकांच्या दारिद्रयास केवळ सरकार कारणीभूत नाही. दारिद्री लोकसुध्दा जबाबदार आहेत. म्हणून दारिद्री लोकांनी एकाच अपत्यावर कुटुंब नियोजन करणे, दारू, तंबाखू, जुगार इत्यादी व्यसनांच्या आहारी न जाणे, जत्रा – यात्रांवर पैसा खर्च न करणे, सरकारी मदतीचा दुरूपयोग न करणे इत्यादी बाबी केल्या पाहिजेत. शासनाने सुध्दा निर्व्यसनी, कष्टकरी व गरीब लोकांनाच प्राधान्याने मदत करावी.

5) आर्थिक विकासाचा वेग वाढविणे :–

आर्थिक विकासाचा वेग योग्य असेल तर देशात अनेक गोष्टी साध्य होत असतात. दारिद्रय निर्मूलनाचा सर्वात योग्य उपाय म्हणजे आर्थिक विकासाचा वेग वाढविणे होय. हा वेग वाढल्यामुळे दारिद्रय ज्या वर्गात दिसून येते त्या वर्गापर्यंत अन्न, वस्त्र व निवा–यासारख्या गोष्टी पाझरून येत असतात.

6) व्यावसायिक शिक्षण :–

व्यावसायिक शिक्षण देणे खुप गरजेचे आहे. व्यावसायिक शिक्षणाने व्यक्ति व्यावसासिक कौशल्य प्राप्त करते. त्यामुळे ती लवकर कामधंदयाला लागून, स्वतःच्या दारिद्रयात कमी करण्याचा प्रयत्न करते.

7) लोकसंख्या नियंत्रण :–

भारताची लोकसंख्या जलद गतीने वाढत आहे. म्हणून लोकसंख्या नियंत्रण करणे हा सर्वात महत्वाचा उपाय आहे. देशाची लोकसंख्या नियंत्रित ठेवून गरिबीच्या प्रमाणात घट करता येते.

8) लघू व कुटीर उदयोगांचा विकास :–

लघू व कुटीर उद्योग श्रमप्रधान असतात. त्यामुळे रोजगाराच्या संख्येत वाढ होवून गरिबीचे प्रमाण कमी होते.

9) स्वयंरोजगार :–

ग्रामीण आणि शहरी भागातील युवकांना स्वयंरोजगाराच्या संदर्भात प्रोत्साहन दिले पाहिजे.

10) रोजगार निर्मिती कार्यक्रम :–

दारिद्रय रेषेखाली जीवन जगणा–या दुर्बल लोकांना रोजगार मिळवून देवून त्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी केंद्र व राज्यसरकारांनी अनेक कार्यक्रम सुरू केले. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम, ग्रामीण रोजगारासाठी धडक कार्यक्रम, ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम इत्यादी सुरू केले.

11) उत्पन्न व संपत्तीतील विशमता निर्मूलन :–

देशातील दारिद्रय कमी करण्यासाठी उत्पन्न व संपत्तीच्या वाटपातील विषमता कमी करण्यावर भर दिला गेला पाहिजे. शासन श्रीमंतावर कर आकारून जमा झालेला पैसा गरीबांसाठीच्या योजनांवर खर्च करीत आहे.

सामारोप :–

भारतातील दारिद्रयाचा व त्या मापनाच्या विविध संकल्पनांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, भारतात दारिद्रय मोठया प्रमाणात असून त्याचे प्रमाण अलीकडच्या काळात घटले आहे. दारिद्रयाचे व रोजगाराचे नाते घनिष्ठ असून रोजगारातील वाढ ही गरीबी कमी करण्यास महत्वपूर्ण ठरते. दारिद्रयाचे भारतीय नागरिकांच्या सामाजिक आर्थिक, राजकीय शैक्षणिक, आरोग्यवरही अनिष्ठ परिणाम होतात यांचा भारतीय समाज व्यवस्था, अर्थव्यवस्थेवर अनिष्ठ प्रभाव पडतो याचा प्रत्यया आपणास येतो याबाबत शंका नाही देशाचे उत्पन्न व संपत्तीचे वाटप कशा पध्दतीने होते याचा परिणाम लोकांच्या जीवन पध्दतीवर होतो. देशातील श्रीमंत व गरीब यांच्या प्रमाणावर देशाची आर्थिक परिस्थिती कशी आहे हे समजते.

भारतीय दारिद्रयाची समस्या सोडविण्यासाठी वरील प्रकारच्या उपाययोजना हया महत्त्वपूर्ण ठरतात. भारतामध्ये विकासात्मक दृष्टीकोनातून अकरा पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्यानंतरही देशात 21.9 दरिद्री लोक अबाधित असणे म्हणजे देशाचा सर्वसमावेशक विकास झालेला नाही आणि विशेषतः बहुआयामी दारिद्रय निर्देशांकाच्या दृष्टीकोनातून दारिद्रय अभ्यासले तर ते प्रमाण तब्बल 80 असण्याची शक्यता आहे. त्यामुळे व्यक्तीने स्वतःच आपले

दारिद्रय दूर करण्याचा प्रयत्न केल्यास सरकारनेही दारिद्रय कमी करण्यास हातभार लावला तर नक्कीच देशातील दारिद्रय कमी होऊन भारतीय अर्थव्यवस्था ही विकास व वृध्दिदराचे इंजिन म्हणून उदयास येईल.

संदर्भ ग्रंथसुची :–

1) Bhargava B.K./ vandana sethi- 'Indian Economy' Sultan Chand & Sons, New Delhi, PP 183.
2) Dandekar V.M./ Nilkantha, ' Poverty in India' (1971) Syed Ishaque at sangam press Ltd. 17 B kothrud, Pune, PP-29.
3) Econamic Survey 2012-13
4) वडेर विरेंद्र 'दारिद्रय संकल्पना मापन व वास्तव' शिवार्थ स्मरणिका 2013, पृ. 57.
5) शिवाजी युनिव्हरसिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन कोल्हापूर शिवार्थ – 2013, पृ. 112.
6) रायखेलकर ए.आर. / बी.एच. दामजी भारतीय अर्थव्यवस्था विद्या बुक्स पब्लिकेशर्स औरंगाबाद (जानेवारी 2013).
7) चव्हाण एन. एल. 'भारतीय अथव्यवस्था', प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2015 पृ. क्र. 99
8) अर्थसंवाद – जाने– मार्च 2009.
9) योजना मासिक, ऑक्टोबर 2006.